Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 06 October 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०६ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

गाझा पट्ट्यातील हमास या अतिरेकी संघटनेनं इस्त्राईलवर हल्ला केला त्यास आज एक वर्ष पूर्ण होत आहे. या हल्लयात इस्त्राईलच्या १२०० नागरिकांचा मृयु झाला होता. तेव्हापासून पश्चिम आशीयामध्ये युद्धाचा भडका उडालेला आहे. त्यात आतापर्यंत ४१ हजारांपेक्षा अधिक नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. या युद्धास एक वर्ष पूर्ण झाल्यामुळं संयुक्त राष्ट्र संघाचे महासचिव एंटोनियो गुटेरेस यांनी हमास संघटनेनं बंधक बनविलेल्या इस्त्रायली नागरिकांची विनाशर्त सुटका करण्याचं आवाहन केलं आहे. या युद्धामध्ये आता लेबनॉनसह इराणही सहभागी झाल्यामुळं त्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे संयुक्त राष्ट्र संघानं चिंताही व्यक्त केली आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं वाहनक्षेत्राशी निगडीत उद्योगांचा एकत्रित समुह अर्थात क्लस्टर निर्माण झालं आहे. त्याचआधारे संरक्षण क्षेत्राशी निगडीत डीफेन्स क्लस्टर निर्मितीची क्षमता शहरामध्ये असल्याचं संरक्षण संशोधन आणि विकास संस्था - डी .आर.डी.ओ.चे अध्यक्ष डॉक्टर समीर कामत यांनी म्हटलं आहे.

शहरातील कांचनवाडीच्या छत्रपती शाहु अभियांत्रिकी महाविद्यालयात संरक्षण क्षेत्राशी संबंधीत नवोन्मेष स्पर्धेच्या उद्धाटन प्रसंगी ते काल बोलत होते. छत्रपती संभाजीनगर इथल्या सध्याच्या ऑरिक सिटीसह अन्य औद्योगिक वाटचालीच्या आधारे इथे संरक्षण विषयक उद्योग उभारणीची क्षमता निश्चित असल्याचं ते म्हणाले.

*****

आज जागतिक सेरेब्रल पाल्सी दिवस साजरा केला जात आहे.मेंदुतील बिघाडामुळे स्नायुंच्या हालचाली प्रभावित होणं अशा स्वरुपातील हा आजार आहे.या आजाराबाबत जागरकता आणि त्याच्याशी पिडीतांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणं असा या दिवसाच्या अनुषंगानं आशय असून यासाठी देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेतील ८०० लाभार्थी भाविक थोड्याच वेळात विशेष रेल्वेनं आयोध्येकडं श्री राममंदिर दर्शनासाठी रवाना होत आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजीत पवार हे दूरदृष्यप्रणालीद्वारे यात्रेकरूंना शुभेच्छा देणार आहेत. त्याचवेळी रेल्वेस्थानकावर पालकमंत्री अब्दुल सत्तार हिरवी झेंडी दाखवणार आहेत.

****

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा, आज छत्रपती संभाजीनगर इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे. शहरातल्या खडकेश्वर परिसरातल्या मराठवाडा सांस्कृतिक मंडळ मैदानावर दुपारी दीड वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला जिल्ह्यातल्या लाभार्थी महिलांनी हजर राहण्याचं आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे.

****

शारदीय नवरात्रौत्सवात श्रीक्षेत्र माहूर इथं लाखो भाविक नवरात्रोत्सवात दर्शनासाठी येत आहेत. सकाळी देवीची वैदिक महापूजा, श्री दुर्गासप्तशती शतचंडी पाठ यासह प्रथेनुसार अन्य धार्मिक विधी पार पडले. राज्यभरातून येणाऱ्या भाविकांसाठी इथं पूर्ण व्यवस्था मंदिर समितीच्या वतीनं करण्यात आल्याचं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सांगितलं. दरम्यान, माहूरगडावर देवीच्या दर्शनाला जाण्यासाठीच्या लिफ्टसह स्कायवॉकचं काम गतीमानपणे सुरु असुन, मंदिर परिसरातील रस्ते-अन्य सुविधांचाही विकासाला जिल्हा प्रशासनातर्फे चालना देण्यात आली आहे.

करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीची, काल चंद्रलांबा परमेश्वरी रुपात पूजा बांधण्यात आली होती. या काळात तीन लाखांहून अधिक भाविकांनी अंबाबाई देवीचं दर्शन घेतलं आहे.

तुळजापूर इथं देवीच्या दर्शनास येणाऱ्या भाविकांच्या आरोग्य तपासणीसाठी राज्याचे आरोग्य मंत्री डॉक्टर तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून आरोग्य शिबीरांच्या माध्यमातून पथकं आणि रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या आहेत.

****

येत्या चोवीस तासांत मराठवाड्यासह कोकण मध्य महाराष्ट्रात वीजा-जोराचे वारे यांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. महाराष्ट्रातून येत्या सात-आठ दिवसांत मोसमी पाऊस पूर्णपणे परतून जाईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****

संयुक्त अरब अमिरातीमध्ये सुरु असलेल्या महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारत - पाकिस्तान लढत होणार आहे. साडेतीन वाजता हा सामना सुरू होईल.

तसंच, भारत-बांगलादेश पुरुषांच्या तीन टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज सायंकाळी सात वाजता ग्वाल्हेर इथं खेळला जाणार आहे.

****